राज्यातील शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन वाणिज्य संस्थांमध्ये मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम सुरु ठेवण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
शासन निर्णय क्रमांक :-संकीर्ण - २०१९ /प्र.क्र.२२०/एसडी-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २३ ऑगस्ट, २०१९

संदर्भ:- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एसपीई - १०१२/(१०८ /१२) /साशि-१, दिनांक: ३१ ऑक्टोबर,२०१३
२) शासन शुध्दीपत्र क्रमांक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण - २०१५/(११६ /१५)/एसडी-२, दिनांक: ३० सप्टेंबर, २०१५
३) शासन शुध्दीपत्र क्रमांक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण - २०१६/(११६/१५)/ एसडी-२, दिनांक: १३ जुलै, २०१६
४) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक :-संकीर्ण-२०१७/प्र.क्र. १३६/एस.डी.-२, दि.१६ नोव्हेंबर २०१७

प्रस्तावना:-

राज्यातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयातील कामकाजात संगणकाचा वापर तसेच शासनाच्या सर्व विभागामध्ये ई-गव्हर्नन्स / ई-ऑफिस पध्दत अवलंबण्याचे शासनाने स्वीकारलेले धोरण विचारात घेऊन राज्यातील शासनमान्य वाणिज्य संस्थांमध्ये संगणक टंकलेखन अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय शासनाने संदर्भाधीन दि.३१ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. संगणक टंकलेखन अभ्यासक्रम सुरु करत असताना मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम दि.३० नोव्हेंबर, २०१५ पर्यत टप्प्याटप्याने बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि, यानंतर दि.३० सप्टेंबर,२०१५ च्या शुध्दिपत्रान्वये मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रमास दि.३१ मे, २०१६ पर्यत मुदतवाढ देण्यात आली. यानंतर दि.१३ जुलै,२०१६ च्या शुध्दिपत्रान्वये मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रमास दि.३१ मे, २०१७ पर्यत मुदतवाढ देण्यात आली.

यानंतर दि.१६ नोव्हेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शासनमान्य लघुलेखन टंकलेखन वाणिज्य संस्थांमध्ये संगणक टंकलेखनासोबतच दि.३० नोव्हेबर, २०१९ पर्यंत मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम सुरु ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे. तथापि, संगणक टंकलेखनासोबतच मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम सुरू ठेवावा, अशी मागणी काही संघटनांनी शासनाकडे केली आहे. यानुसार शासनमान्य लघुलेखन टंकलेखन वाणिज्य संस्थांमध्ये संगणक टंकलेखनासोबतच मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम सुरू ठेवण्यास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील शासनमान्य लघुलेखन व टंकलेखन वाणिज्य संस्थांमध्ये संगणक टंकलेखनासोबतच मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम दि.३० नोव्हेंबर, २०१९ नंतरही सुरु ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन वाणिज्य संस्थांनी मॅन्युअल टंकलेखनासोबतच संगणक टंकलेखनाचा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी आवश्यक बदल संस्थांमध्ये करुन घ्यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२२१६४९०६६१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna Siddharth Kharat

Digitally signed by Suvarna Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=065279b98828b1456ad0d62a97fa45eee948af8abe5a27104d4e132c5bd1d93a, cn=Suvarna Siddharth Kharat
Date: 2019.08.23 17:43:55 +05'30'

(डॉ. सुवर्णा सि. खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१) मा.मुख्यमंत्री सचिव,मंत्रालय,मुंबई.
२) मा. अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण व क्रिडा विभाग),मंत्रालय,मुंबई.
३) मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.अपर मुख्य सचिव (सामान्य प्रशासन विभाग) यांचे स्विय सहाय्यक
५) प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग,मंत्रालय मुंबई.
६) मा. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, पुणे.
९) आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद,पुणे
१०) संचालक,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे
११) विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ (सर्व).
१२) सर्व सहसचिव/उपसचिव शालेय शिक्षण ,मंत्रालय,मुंबई.
१३) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१४) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/(प्राथमिक), जिल्हा परिषद.
१५) अवर सचिव/कक्ष अधिकारी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई
१६) अवर सचिव,(१४-अ) सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
१७) सर्व शिक्षण निरीक्षक, मुंबई (पूर्व ,पश्चिम, उत्तर)
१८) निवड नस्ती (एसडी - २).